**महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमीच्या योजनांची नियमावली निश्चित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शासन निर्णय क्र. गुसाअ - २०१३/नियमावली/प्र.क्र.१०५/सां.का.४**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**मादाम काम रोड, हुतात्मा राजगुरु चौक**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : १८ जून, २०१३.**

**प्रस्तावना :-** गुजराती साहित्याच्या सर्वांगीण उन्नतीसाठी व उत्तेजर्नासाठी महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमीची दि. ३० ऑगस्ट, १९९६ रोजी शासनामार्फत स्थापना करण्यात आली आहे. सदर अकादमीमार्फत गुजराती भाषेच्या उन्नतीसाठी ज्या विविध योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत, त्या योजनांच्या अंमलबजावणीसंदर्भात एक मार्गदर्शक नियमावली तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** विचारांती या शासन निर्णयान्वये गुजराती साहित्य अकादमीमार्फत राबविण्यात येणा-या विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे नियमावली निश्चित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**(अ) — पुरस्कार योजना**

१) **उद्दिष्ट :-** गुजराती साहित्य क्षेत्रात मोलाचे कार्य व भरीव योगदान देणा-या साहित्यिकांना तसेच प्रतिवर्षी उत्कृष्ट गुजराती वाङ्.मय निर्मितीकरीता लेखकांना उत्तेजन देण्यासाठी, पुरस्कार देऊन सन्मानित करणे हे या पुरस्काराचे उद्दिष्ट आहे.

२) **पुरस्काराचे स्वरुप** -

| अ. क्र | पुरस्काराचे नाव | पुरस्कारर्थीची रक्कम |
|---|---|---|
| | **नर्मद पुरस्कार** | |
| १ | कवी नर्मद मराठी साहित्य पुरस्कार | रु.५१,०००/- |
| २ | कवी नर्मद गुजराती साहित्य पुरस्कार | रु.५१,०००/- |
| | **जीवन गौरव पुरस्कार** | |
| ३ | साहित्य | रु.५१,०००/- |
| ४ | कला | रु.५१,०००/- |
| ५ | पत्रकारीता | रु.५१,०००/- |
| ६ | संस्था | रु.५१,०००/- |
| | **वाङ्.मय पुरस्कार** | |
| ७ | चुनीलाल मडिया पुरस्कार (पुस्तकाचा प्रकार- नवल कथा) | प्रथम- रु.१५,०००/-<br>द्वितीय - रु.१०,०००/- |

रोटT/मुच-०१२३[३००-६-२०१३]-१

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| ८ | रामनारायण पाठक पुरस्कार (पुस्तकाचा प्रकार- लघुकथा) | प्रथम- रु.१५,०००/- |
| | | द्वितीय - रु.१०,०००/- |
| ९ | हरिश्चंद्र भट्ट पुरस्कार (पुस्तकाचा प्रकार- कविता) | प्रथम- रु.१५,०००/- |
| | | द्वितीय - रु.१०,०००/- |
| १० | प्रबोध जोशी पुरस्कार (पुस्तकाचा प्रकार- नाटक) | प्रथम- रु.१५,०००/- |
| | | द्वितीय - रु.१०,०००/- |
| ११ | वाडीलाल डगली पुरस्कार (पुस्तकाचा प्रकार- ललित निबंध) | प्रथम- रु.१५,०००/- |
| | | द्वितीय - रु.१०,०००/- |
| १२ | प्रागजी डोसा पुरस्कार (पुस्तकाचा प्रकार- बाल साहित्य) | प्रथम- रु.१५,०००/- |
| | | द्वितीय - रु.१०,०००/- |
| १३ | यशवंत दोशी पुरस्कार (पुस्तकाचा प्रकार- नवोदित लेखक) | प्रथम- रु.१५,०००/- |
| | | द्वितीय - रु.१०,०००/- |
| १४ | गोपाळराव विद्ववांस पुरस्कार (पुस्तकाचा प्रकार- अनुवाद) | प्रथम- रु.१५,०००/- |
| | | द्वितीय - रु.१०,०००/- |

सर्व पुरस्कारार्थांना रोख रक्कमेसह शाल, श्रीफळ, मानचिन्ह व मानपत्र देऊन गौरविण्यात येईल.

३) **पुरस्काराचे क्षेत्र-**

१. कवी नर्मद व जीवन गौरव पुरस्कार :- गुजराती साहित्य, कला व पत्रकारिता या क्षेत्रात प्रदीर्घ काळ मोलाचे योगदान देणा-या व त्यासाठी आपले आयुष्य वेचलेल्या मान्यवरांचा जीवन गौरव पुरस्कारासाठी विचार करण्यात येतो, तसेच ज्या पंचीकृत संस्था समाजाचे व साहित्यांचे प्रचार करीत असेल अशा संस्थांचासुध्दा जीवन गौरव पुरस्कारासाठी विचार करण्यात येतो.

२. वाड्मय पुरस्कार :- उत्कृष्ट गुजराती वाड्.मय निर्मितीसाठी साहित्यिकांना प्रोत्साहित करण्याकरीता प्रतिवर्षी प्रकाशित होणा-या पुस्तकांमधून (लघुकथा, नवलकथा, कविता, नाटक/एकांकिता, ललित साहित्य व बालसाहित्य या ६ वाड्.मय प्रकारांमधून) उत्कृष्ट पुस्तक लिहिणा-या लेखकांचा वाड्मय पुरस्कारासाठी विचार करण्यात येतो.

४) **पुरस्कारासाठी पात्रता :-**

१) जीवन गौरव पुरस्कारासाठी

अ) उत्तमोत्तम साहित्याची निर्मिती करणारा साहित्यिक, कलाकार, पत्रकार व संस्था या पुरस्कारासाठी पात्र आहे.

ब) अशी व्यक्ती/संस्था सध्या प्रकाशात नसली तरी त्या क्षेत्रात कार्यरत असणारी असावी.

क) पुरस्कार्थी व्यक्तीचे गुजराती साहित्य क्षेत्रातील कर्तृत्व / ज्येष्ठता सिध्द असावी.

ड) राज्यस्तरीय सन्मान जीवनगौरव पुरस्कारासाठी गुजराती साहित्यिकाची निवड करताना त्यांचे महाराष्ट्रामध्ये किमान १५ वर्षे वास्तव्य असणे आवश्यक आहे.

२) वाड्.मय पुरस्कारासाठी

अ) प्रत्येक वर्षाचा १ जानेवारी ते ३१ डिसेंबर च्या दरम्यान प्रकाशित होणा-या मूळ साहित्य कृतींचा याअंतर्गत विचार करण्यात येईल.



Scanned by CamScanner

ब) याअंतर्गत लघुकथा, नवलकथा, कविता, नाटक/एकांकिता, ललित साहित्य व बालसाहित्य या ६ वाङ्.मय प्रकारांचा विचार करण्यात येईल.

ब) वाङ्मय पुरस्कारासाठी गुजराती साहित्यिकाच्या पुस्तकाची निवड करताना संबंधित साहित्यिकाचे महाराष्ट्रामध्ये किमान १५ वर्षे वास्तव्य असणे आवश्यक आहे.

**५) समिती :-** कवी नर्मद व जीवन गौरव या पुरस्कारासाठी गुजराती साहित्य अकादमीमार्फत एक समिती गठीत करण्यात येईल. यासाठी वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन शिफारशी मागविण्यात येतील व प्राप्त शिफारशी तसेच समिती सदस्यांच्या शिफारशीनुसार समितीमार्फत पुरस्कारार्थ्यांची निवड करण्यात येईल. समितीच्या निवडलेल्या पुरस्कार्थ्यांच्या प्रस्तावास शासनाची मान्यता घेऊन याप्रकरणी पुरस्कार जाहीर करण्यात येतील.

वाङ्.मय पुरस्कारासाठी वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन शिफारशी मागविण्यात येतील. प्राप्त पुस्तकांची छाननी करण्यासाठी गुजराती अकादमीमार्फत एक छाननी समिती गठीत करण्यात येईल. छाननी समितीने निवड केलेल्या पुरस्कार्थ्यांच्या प्रस्तावास शासनाची मान्यता घेऊन याप्रकरणी पुरस्कार जाहीर करण्यात येतील.

**६) पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भातील नियमावली :-**

१. साहित्यिकास ज्या वाङ्.मय क्षेत्रासाठी पुरस्कार प्राप्त होईल, त्या साहित्यिकास पुढील २ वर्षे त्याच वाङ्.मय क्षेत्रासाठी पुरस्कार मिळण्यास्तव अर्ज करता येणार नाही. परंतु अशा साहित्यिकास दुस-या वाङ्.मय क्षेत्रासाठी पुरस्कार मिळण्यास्तव अर्ज करता येईल. उदा. एखाद्या साहित्यिकास काव्य या वाङ्.मय क्षेत्रासाठी एकदा पुरस्कार प्राप्त झाला तर त्या साहित्यिकास पुढील २ वर्षे काव्य या वाङ्.मय क्षेत्रासाठी पुरस्कार मिळण्यास्तव अर्ज करता येणार नाही. मात्र त्याच साहित्यिकास काव्य क्षेत्र वगळून इतर वाङ्.मय क्षेत्रासाठी (बालसाहित्य, नाटक, ललित साहित्य, निबंध वगैरे) पुरस्कार मिळण्यास्तव अर्ज करता येईल.

२. साहित्यिकास एकावेळी वेगवेगळया वाङ्.मय क्षेत्राअंतर्गत पुरस्कार मिळण्यासाठी अर्ज करता येतील. मात्र, साहित्यिकास एका वर्षी केवळ त्याच्या एकाच वाङ्.मय क्षेत्रासाठी पुरस्कार देण्यात येईल.

३. वाङ्.मय क्षेत्रातील पुरस्कारासाठी साहित्यिकाचे पुस्तक हे १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कॅलेंडर वर्षनिहाय प्रकाशित झालेले असणे अपेक्षित आहे.

४. स्वत: साहित्यिकाव्यतिरिक्त संस्थेमार्फत, प्रकाशकांमार्फत किंवा मान्यवर व्यक्तींमार्फत प्राप्त झालेल्या अर्जांचा देखील पुरस्कारासाठी विचार करण्यात येईल.

५. मराठी भाषेमधून गुजराती भाषेमध्ये अनुवादित करण्यात येणारी पुस्तके वाङ्.मय पुरस्कारांतर्गत पात्र धरण्यात येतील. मात्र मराठी वगळता अन्य भाषांमधून गुजराती भाषेमध्ये अनुवादित करण्यात येणारी पुस्तके वाङ्.मय पुरस्कारांतर्गत पात्र धरण्यात येणार नाहीत.

६. डिलीट, पीएचडी, एफफिल यांसारख्या शिक्षणासाठी संबंधित अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने शोधप्रबंध, संपादित संकलन, पाकशास्त्र तथा इतर ग्रंथ छापले असतील तर त्यांचा पुरस्कारासाठी विचार करता येणार नाही.



Scanned by CamScanner

७. पुरस्कारासाठी राज्यस्तरीय व मान्यताप्राप्त वृत्तपत्रांत प्रसिध्दी देऊन अर्ज मागविण्यात येतील. तसेच याबाबतच्या पत्रिका विद्यालय, गुजराती साहित्याशी संबंधित संस्था आणि महाराष्ट्र राज्य गुजराती अकादमीच्या सदस्यांना त्यांच्या शिफारशी पाठविण्यासाठी देण्यात येतील. त्याचप्रमाणे अकादमीच्या वेबसाईटवर याबाबतचे अर्ज प्रसिध्द करण्यात येतील.

८. पुरस्कारप्राप्त मान्यवर तसेच पुरस्कारासाठी बोलाविण्यात आलेले प्रमुख अतिथी (जास्तीत-जास्त दोन) त्याचप्रमाणे गुजराती अकादमीचे सदस्य यांची पुरस्कार प्रदान सोहळयाच्या वेळेस निवासी व्यवस्था करण्यात येईल.

९. पुरस्कारप्राप्त मान्यवर, गुजराती अकादमीचे सदस्य तसेच पुरस्कारासाठी बोलाविण्यात आलेले प्रमुख अतिथी (जास्तीत-जास्त दोन) यांना पुरस्कार प्रदान सोहळयाच्यावेळी कार्यक्रमाच्या ठिकाणी येण्यासाठी वातानुकुलीत तृतीय श्रेणीच्या रेल्वेच्या तिकिटाच्या दराइतकी रक्कम अदा करण्यात येईल.

**<u>७) पुरस्कार योजनेबाबतचे वेळापत्रक :</u>**

१. प्रतिवर्षी वृत्तपत्रामध्ये एप्रिल महिन्यात म्हणजेच आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस जाहिरात देण्यात यावी.

२. प्राप्त शिफारशी तसेच पुस्तकांची छाननी करण्याची कार्यवाही जून अखेरपर्यंत पूर्ण करण्यात यावी.

३. अकादमीच्या समितीची बैठक घेऊन पुरस्कारर्थीची निवड प्रक्रिया जुलै अखेरपर्यंत पूर्ण करुन त्यास शासन मान्यता घेण्यात यावी.

४. प्रतिवर्षी दि.२४ ऑगस्ट रोजी गुजराती भाषा दिनी पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात यावा.

## (ब) - ग्रंथालय अनुदान योजना

१) **उद्दिष्ट :-** गुजराती भाषेची उन्नती करण्यासाठी गुजराती पुस्तकाच्या लिखाण वाचनाची आवश्यकता आहे. गुजराती पुस्तकांच्या माध्यमातूनच गुजराती साहित्याचा प्रचार व प्रसार होणार असल्यामुळे या बाबीस प्रोत्साहन देण्यासाठी ग्रंथालयांना गुजराती पुस्तके खरेदीसाठी अनुदान देण्याची योजना जरुरी आहे.

२) **योजनेचे स्वरुप :-**

**१.** प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस म्हणजेच एप्रिल महिन्यात वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन ग्रंथालयाकडून गुजराती पुस्तके विकत घेण्यासाठी पुस्तकाची यादी मागविण्यात येईल.

**२.** पुस्तकांची यादी सादर करताना त्यामध्ये पुस्तकाचे नांव, लेखकाचे नांव, साहित्य प्रकार, प्रकाशन संस्थेचे नांव, प्रकाशन वर्ष व पुस्तकाची किंमत इ. बाबतचे विवरणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

**३.** सदर अनुदान हे ग्रंथालयांना गुजराती पुस्तके विकत घेण्यासाठीच मिळेल. ग्रंथालयांनी या अनुदानाचा उपयोग कार्यालयीन खर्च, उदा. फर्निचर, वेतन,



Scanned by CamScanner

व्यवस्थापकीय खर्च तसेच इतर ग्रंथालयीन कामकाजासाठी यासाठी करता येणार नाही.

४. ग्रंथालयांना पुस्तकांसाठी अनुदान देताना त्यामध्ये नवलकथा, कविता, नाटक, निबंध, ललितकथा, विवेचन, चिंतन, साहित्यिक संपादन इ. वाङ्‌मय प्रकाराचा समावेश असावा. परंतु साहित्येत्तर पुस्तके उदा. पाककृती पुस्तक, वैद्यकीय अथवा शालेय अभ्यासक्रमाबाबतचे पुस्तक, उद्योगधंदे वगैरेचा समावेश असलेल्या पुस्तकांच्या खरेदीस अनुदान देता येणार नाही.

५. अनुदानातून विकत घेण्यात येणा-या पुस्तकाच्या पाहिल्या व शेवटच्या पानावर गुजराती भाषेमध्ये खालील मजकूर असलेला रबरस्टॅम्प मारलेला असावा.

| |
|---|
| हे पुस्तक महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमीकडून प्राप्त अनुदानातून खरेदी केलेले आहे. |

६. ज्या ग्रंथालयांना पुस्तक खरेदीसाठी अनुदान मिळाले आहे, अशा संस्थांनी पुस्तक विकत घेतल्यानंतर पुस्तकाच्या देयकाच्या झेरॉक्सप्रती संधीलेखापालाच्या सही-शिक्क्याने अकादमीस सादर केल्यानंतरच सदर ग्रंथालयास पुढील वर्षी अनुदानाची मागणी करता येईल.

७. ग्रंथालयांना अनुदान देण्यासंदर्भातील अकादमीचा निर्णय अखेरचा राहील.

८. या योजनेअंतर्गत अनुदानाची मागणी अमान्य करताना कोणतेही कारण दिले जाणार नाही.

९. जो पुस्तक विक्रेता अकादमीला १०% किंवा त्यापेक्षा सवलत व घरपोच पुस्तके पुरवित असेल त्यानुसार अकादमीच्या बैठकीत त्याबाबत विचार करुन निर्णय घेण्यात येईल.

३) **अनुदानाचे स्वरुप :-**

१. रु.२०.,०००/- ते रु.२५,०००/- पर्यंतच्या किंमत्तीच्या पुस्तकांच्या खरेदीसाठी अनुदान देण्यात येईल.

४) **योजनेसाठीची पात्रता :-**

१. नोंदणीकृत संस्थेद्वारे चालविण्यात येणा-या मोफत ग्रंथालयांनाच या योजनेचा लाभ मिळू शकेल.

२. खाजगी अथवा व्यावसायिक तत्वावर चालविण्यात येणारे ग्रंथालये या योजनेचा लाभ मिळण्यास पात्र ठरणार नाही.

## (क) पुस्तकांच्या प्रकाशनाकरीता अनुदान योजना

१) **उद्दिष्ट :-** गुजराती भाषेतील साहित्यिकांना उत्तेजन देण्यासाठी तसेच त्यांना सर्जनशील वाचकांपर्यत पोहोचविण्यासाठी सदर योजना सुरु करण्यात आली आहे.

२) **योजनेचे स्वरुप :-**

१. प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस म्हणजेच एप्रिल महिन्यात वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन साहित्य कृती मागविण्यात येतील.



Scanned by CamScanner

२. साहित्यिकांनी अकादमीकडे विहित नमुन्यामध्ये आवेदनपत्र संपूर्ण तपशिलासह पाठविणे आवश्यक राहील.

३. आवेदन पत्रासोबत साहित्यकृतीचे सुवाच्च अक्षराचे दोन हस्तलिखित देण्यात यावे. हस्तलिखित कोणत्याही कारणास्तव नामंजूर झाले तरी परत करण्यात येणार नाही.

४. साहित्यिकाने आवेदनपत्रासोबतच सदर पुस्तकाच्या प्रकाशनास येणा-या खर्चाबाबतचे अंदाजपत्रक जोडण्यात यावे.

५. सदर साहित्यकृतींची छाननी अकादमीमार्फत गठीत करण्यात आलेल्या समितीद्वारे करण्यात येईल. समितीने सदर छाननी सर्वसाधारणपणे प्रत्येक आर्थिक वर्षी जून-जुलै या महिन्यात करावी.

६. साहित्यकृती अनुदानासाठी पात्र ठरल्यानंतर सदर साहित्यकृतीच्या प्रकाशनाची व्यवस्था लेखकाला स्वत: करावी लागेल, अथवा प्रकाशन संस्थेकडून करुन घ्यावी लागेल. प्रकाशनासाठी लागणारा कालावधी प्रकाशन संस्थेकडून प्रमाणित करुन घेऊन त्याची प्रत आवेदन पत्रासोबत जोडणे आवश्यक असेल.

७. साहित्यकृतीच्या प्रकाशनाला अनुदान दिल्यानंतर अनुदान मंजुरीच्या पत्रात प्रकाशनासाठी नमूद केलेल्या वेळमर्यादेमध्येच सदर पुस्तक प्रकाशित करणे आवश्यक असेल.

८. साहित्यकृती प्रकाशित झाल्यानंतर त्याच्या २५ प्रती अकादमीस विनामुल्य द्याव्यात.

९. साहित्यकृतीचे प्रकाशन करताना त्याच्या पहिल्या पानावर खालील मजकूर गुजराती भाषेमध्ये प्रकाशित करणे आवश्यक आहे.

| |
|---|
| हे पुस्तक महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमीच्या पुस्तक प्रकाशन अनुदान योजनेअंतर्गत प्राप्त अनुदानाच्या सहयोगातून प्रकाशित करण्यात येत आहे. |

१०.एका साहित्यिकाच्या / लेखकाच्या साहित्यकृतीस ५ वर्षातून एकदाच अनुदान देण्यात येईल.

११.आवेदनपत्रातील माहिती खोटी असल्यास किंवा योजनेच्या अटी/शर्तीचा भंग झाल्याचे आढळल्यास मंजूर केलेले अनुदान रद्द करण्यात येईल. आणि जर अनुदान दिले गेले असेल तर ते व्याजासहित परत घेतले जाईल. आवश्यकता भासल्यास कठोर कायदेशीर उपाययोजना केली जाईल.

१२.या योजनेअंतर्गत अनुदानाची मागणी अमान्य करताना कोणतेही कारण दिले जाणार नाही.

**३. अनुदानाचे स्वरुप :-**

१. ज्या साहित्यकृती समितीमार्फत प्रकाशित करण्यासाठी पात्र ठरविण्यात येतील, त्या साहित्यकृतीच्या प्रकाशनासाठी साहित्यिकाने जोडलेल्या अंदाजपत्रकातील खर्चाच्या ५०% रक्कम अथवा रु.२०.०० हजार यामधील जी रक्कम कमी असेल ती रक्कम अनुदान म्हणून मंजूर करण्यात येईल.

**४. योजनेसाठीची पात्रता :-**

१. महाराष्ट्रात १५ वर्षे सलग वास्तव्य असणारे गुजराती साहित्यिक (१५ वर्षाचा वास्तव्याचा पुरावा म्हणून अधिवास प्रमाणपत्र सादर करावे लागेल)



Scanned by CamScanner

२. एका साहित्यिकास ५ वर्षातून एकदाच या योजनेचा लाभ घेता येईल.

३. या योजनेअंतर्गत प्रकाशित होणाऱ्या पुस्तकाला कोणत्याही खाजगी संस्था अथवा राज्य शासन अथवा केंद्र शासनाचे कोणतेही अनुदान मिळणार नाही.

४. सदर अनुदान हे मूळ साहित्यकृतीलाच मिळेल. अनुदानित किंवा संपादित पुस्तकांच्या प्रकाशनाला हे अनुदान मिळणार नाही.

५. साहित्यकृतीच्या प्रथम आवृत्तीच्या प्रकाशनासच सदर अनुदान मिळू शकेल. पुर्नमुद्रण अथवा नंतरच्या आवृत्तींच्या प्रकाशनासाठी हे अनुदान मिळणार नाही.

६. साहित्यक्षेत्रातील पुढील वाड्.मय प्रकार सदर योजनेअंतर्गत अनुदानासाठी पात्र राहतील. कविता, नवलकथा, लघुकथा, नाटके/एकांकिका, ललित आणि बालसाहित्य.

**५. समिती :-** प्राप्त साहित्य कृतींची अनुदान देण्यासंदर्भात योग्यता ठरविण्यासाठी अकादमीमार्फत तज्ञ व्यक्तींची एक समिती गठीत करण्यात येईल. सदर समितीमार्फत साहित्यकृतींची छाननी करुन अनुदान देण्यासंदर्भात अंतिम निर्णय घेण्यात येईल. साहित्यकृतीच्या प्रकाशनासाठी पात्र / अपात्रतेसंदर्भात समितीने घेतलेला निर्णय अखेरचा राहील. या विषयावर कोणताही वाद वा चर्चा होऊ शकणार नाही. तसेच हस्तलिखिते परत मिळणार नाहीत.

**टिप :-** एखाद्या लेखकाच्या साहित्य कृतीचे महत्व जाणून या योजनेच्या अटी / शर्तीमध्ये शिथिलता देऊन सदर साहित्यकृतीच्या प्रकाशनासाठी अनुदान देण्याचे अधिकार गुजराती अकादमीच्या मा.अध्यक्षांच्या बैठकीखाली आयोजित केलेल्या कार्यकारी समितीच्या बैठकीस राहील.

## (ड) गुजराती अकादमीमार्फत आयोजित कार्यक्रमाबाबतची नियमावली.

१. **लोकसाहित्य डायरा :-** महाराष्ट्रात ज्या शहरांमध्ये गुजराती समाजाची मोठया प्रमाणात वस्ती आहे, अशा शहरांमध्ये गुजराती लोकसाहित्य डायरा किंवा कवीसंमेलन अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल. प्रत्येक वर्षी ४ शहरांची अकादमीच्या कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये निवड करण्यात येईल व तेथे लोकसाहित्य डायरा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल. प्रत्येक कार्यक्रमासाठी रु.२.०० लाख इतक्या मर्यादेपर्यंत खर्च करण्यात येईल. त्यामुळे या प्रयोजनासाठी एकूण रु.८.०० लाख इतका खर्च करण्यात येईल. अकादमीच्या कार्यकारी समितीच्या बैठकीत शहरांची नांवे अंतिम झाल्यानंतर खर्चाच्या बाबवार सविस्तर प्रस्तावास शासन मान्यता घेऊन त्यानंतर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

२. **पुफरिडींग व शुध्दलेखन कार्यशाळा :-** गुजराती भाषा शुध्द स्वरुपामध्ये लिहिता-वाचता यावी, या उद्देशाने अकादमीमार्फत प्रतिवर्षी सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात येईल. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी अकादमी साहित्य क्षेत्राशी संबंधित नोंदणीकृत संस्थेच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करील. नोंदणीकृत संस्थेची



Scanned by CamScanner

निवड ही अकादमीच्या कार्यकारी समितीच्या मान्यतेने करण्यात यावी. यासाठी कमाल रु.१.०० लाख इतका खर्च करण्यात यावा व याबाबतच्या खर्चाच्या बाबवार सविस्तर प्रस्तावास शासन मान्यता घेऊन त्यानंतर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

३. **महिला साहित्य सेमिनार :-** महिलांमध्ये गुजराती साहित्याबद्दलची जागृती निर्माण करण्यासाठी अकादमीमार्फत महिला साहित्य सेमीनार आयोजित करण्यात येईल. या प्रयोजनासाठी अकादमी साहित्य क्षेत्राशी संबंधित महिला संघटनेच्या नोंदणीकृत संस्थेचे सहकार्य घेऊ शकेल. नोंदणीकृत संस्थेची निवड ही अकादमीच्या कार्यकारी समितीच्या मान्यतेने करण्यात यावी. यासाठी कमाल रु.२.०० लाख इतका खर्च करण्यात यावा व याबाबतच्या खर्चाच्या बाबवार सविस्तर प्रस्तावास शासन मान्यता घेऊन त्यानंतर कार्यक्रमाचे आ०योजन करण्यात यावे.

गुजराती साहित्य अकादमीच्या उपरोक्त योजनांचा खर्च मागणी क्र. झेडडी-२, प्रधान लेखाशिर्ष २२०५ कला व संस्कृती, १०२ कला व संस्कृती यांचे प्रचालन प्रचालन (१२) (०२) गुजराती अकादमी (२२०५ १९६४) ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली मंजूर तरतूदीतून भागविण्यात येईल.

हा शासन निर्णय, प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

**( गीता रा. कुलकर्णी )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

मा. मंत्री (सां.का) तथा अध्यक्ष, गुजराती साहित्य अकादमी यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (सां.का.) तथा उपाध्यक्ष, गुजराती साहित्य अकादमी यांचे खाजगी सचिव
मा. कार्याध्यक्ष, गुजराती साहित्य अकादमी यांचे स्वीय सहाय्यक
सर्व मा. सदस्य, गुजराती साहित्य अकादमी
प्रधान सचिव (प. व सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक
संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
सह संचालक गुजराती साहित्य अकादमी, मुंबई
महालेखापाल (महाराष्ट्र १) (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता ) मुंबई
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
अवर सचिव (अर्थसं) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती, सां.का.४

-----------

एच-०९२३ -४३.

Scanned by CamScanner

महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमीच्या योजनांच्या नियमावलीतील वाङमय पुरस्कारामध्ये प्रकिर्ण ( समीक्षा ) या प्रकाराचा समावेश करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्र. गुसाअ ७११८ / प्र. क्र. २१/सां.का.४
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २ नोव्हेंबर, २०१८

वाचा :- १) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. गुसाअ २०१३/नियमावलीत/ प्र.क्र.१०५/सां.का.४, दिनांक १८ जून, २०१३

२) महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमी, मुंबई यांचे पत्र क्र. मरागुसाअ/२३९/ सां.का./२०१८, दिनांक २४ जानेवारी, २०१८

प्रस्तावना :-

गुजराती साहित्याच्या सर्वांगिण उन्नतीसाठी व उत्तेजनासाठी महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमी, मुंबई या कार्यालयाची दिनांक ३० ऑगस्ट, १९९६ रोजी स्थापना करण्यात आली आहे. सदर अकादमीमार्फत गुजराती भाषेच्या उन्नतीसाठी ज्या विविध योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत, त्या योजनांच्या अंमलबजावणीसंदर्भात संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णयान्वये नियमावली तयार करण्यात आली आहे. या नियमावलीन्वये विविध विषयाबाबतचे ८ वाङमय पुरस्कार देण्यात येतात. या वाङमय पुरस्कारात प्रकिर्ण (समीक्षा) या पुरस्काराचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमीच्या निश्चित केलेल्या योजनांच्या नियमावलीतील वाङमय पुरस्कारात "प्रकिर्ण (समीक्षा)" या ९ व्या पुरस्काराचा खालीलप्रमाणे समावेश करण्यात येत आहे.

पात्रता :-

१. प्रत्येक वर्षाच्या १ जानेवारी ते ३१ डिसेंबर च्या दरम्यान प्रकाशित होणा-या मूळ साहित्य कृतींचा याअंतर्गत विचार करण्यात येईल.
२. या पुरस्कारअंतर्गत "प्रकीर्ण (समीक्षा)" या वाङमय प्रकाराचा विचार करण्यात येईल.
३. या पुरस्कारासाठी गुजराती साहित्यिकांच्या पुस्तकांची निवड करताना संबंधित साहित्यिकांचे महाराष्ट्रात किमान १५ वर्षे वास्तव्य असणे आवश्यक आहे.



Scanned by CamScanner

वित्तीय तरतूद :-

| अ.क्र. | वाङमय पुरस्काराचा प्रकार | पुरस्काराची रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | प्रकीर्ण (समीक्षा) | प्रथम - १५,०००/- |
| | | द्वितीय - १०,०००/- |
| | एकूण रुपये | २५,०००/- |

तसेच, प्रकिर्ण (समीक्षा) या प्रकारांतर्गत वाङमय पुरस्काराचे अर्ज मागविणे, पुरस्कार प्रदान करणे इ. कार्यवाही शासन निर्णय क्र. गुसाअ २०१३/नियमावली/प्र.क्र.१०५/सां.का.४, दिनांक १८ जून, २०१३ मधील महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमीच्या नियमावलीमधील अ.क्र.७ नुसारच्या वेळापत्रकानुसार करण्यात येईल व पुरस्कार सोहळयाच्या वेळी पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

२. महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमीच्या उपरोक्त पुरस्काराचा खर्च लेखाशिर्ष झेडडी-२, २२०५ कला व संस्कृती, (१२) गुजराती अकादमी, (१२) (०२) गुजराती अकादमीची आस्थापना (कार्यक्रम), (२२०५ १७२१) ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली चालू आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यास या संबंधीच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १४७/२०१८/१४४३, दिनांक ६ सप्टेंबर, २०१८ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २५२/२०१८/व्यय-१५, दिनांक १ ऑक्टोबर, २०१८ अन्वये मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१८११०२१६५९४९५०२३----- असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( विलास रा. थोरात )
शासनाचे उप सचिव

प्रति,

१. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई,
२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई, ( २ प्रती )
३. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
४. महालेखापाल-१ मुंबई (लेखा व अनुज्ञेयता १ / ले.प.) महाराष्ट्र राज्य,
५. अवर सचिव (अर्थसंकल्प), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
६. निवड नस्ती, सां.का.४.



Scanned by CamScanner

**महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमीच्या योजनांच्या नियमावलीतील वाङ्मय पुरस्कारामध्ये प्रकिर्ण ( समीक्षा ) या पुरस्कारास "गुलाबदास ब्रोकर पुरस्कार (प्रकिर्ण)" असे नाव देण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन निर्णय क्र. गुसाअ ७११८/प्र. क्र. २१/सां.का.४**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : २६ ऑगस्ट, २०१९**

**वाचा :-** १) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. गुसाअ २०१३/नियमावलीत/प्र.क्र.१०५/सां.का.४, दिनांक १८ जून, २०१३

२) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. गुसाअ ७११८/प्र.क्र.२१/सां.का.४, दिनांक ०२ नोव्हेंबर, २०१८

३) महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमी, मुंबई यांचे पत्र क्र. मरागुसाअ/१५२९/२०१९ दिनांक १९ ऑगस्ट, २०१९

**प्रस्तावना :-**

गुजराती साहित्याच्या सर्वांगिण उन्नतीसाठी व उत्तेजनासाठी महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमी, मुंबई या कार्यालयाची दिनांक ३० ऑगस्ट, १९९६ रोजी स्थापना करण्यात आली आहे. सदर अकादमीमार्फत गुजराती भाषेच्या उन्नतीसाठी ज्या विविध योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत, त्या योजनांच्या अंमलबजावणीसंदर्भात उपर्निर्दिष्ट क्र. १ येथील शासन निर्णयान्वये नियमावली तयार करण्यात आली आहे. या नियमावलीन्वये विविध विषयाबाबतचे वाङ्मय पुरस्कार देण्यात येतात. उपर्निर्दिष्ट क्र.२ अन्वये सदर नियमावलीत वाङ्मय पुरस्कारात प्रकिर्ण (समीक्षा) या वाङ्मय पुरस्कारात प्रकिर्ण (समीक्षा) या पुरस्काराचा समावेश करण्यात आला आहे. सदर पुरस्कारास "गुलाबदास ब्रोकर पुरस्कार (प्रकिर्ण)" असे नाव देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

उपर्निर्दिष्ट क्र. २ येथील शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमीच्या निश्चित केलेल्या योजनांच्या नियमावलीतील वाङमय पुरस्कारात समाविष्ट करण्यात आलेल्या "प्रकिर्ण (समीक्षा)" या ९ व्या पुरस्काराचे नाव **"गुलाबदास ब्रोकर पुरस्कार (प्रकिर्ण)"** असे करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०८२६१५१६२४०३२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

Prasad Mahadeo Mahajan

Digitally signed by Prasad Mahadeo Mahajan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tourism And Cultural Affairs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6fcffe7574d536c6e270856345547bb470a3e70655baa82e214fc4d0cfaccaed, serialNumber=b8ea3f1827aabafa30caec97c98f4c9643851c3a32cfa11a13f635fc0bea0ac3, cn=Prasad Mahadeo Mahajan
Date: 2019.08.26 15:31:54 +05'30'

**( प्रसाद म. महाजन )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
३. उप सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. सहसंचालक तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमी, मुंबई
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. महालेखापाल (लेखापरीक्षा) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
८. महालेखापाल (लेखापरीक्षा) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
११. निवड नस्ती, सां.का.४

महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमीमार्फत देण्यात येणाऱ्या पुरस्कार रकमेत वाढ करण्यास मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२४/प्र.क्र.२५७/सां.का.४**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : २४ सप्टेंबर, २०२४**

**वाचा :** शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र. गुसाअ-२०१३/ नियमावली/प्र.क्र.१०५/सां.का.४, दिनांक १८ जून, २०१३.

**प्रस्तावना :-**

गुजराती भाषेच्या प्रसार-प्रचारासाठी तसेच, गुजराती साहित्याच्या सर्वांगीण उन्नती व विकासासाठी महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमी स्थापन करण्यात आलेली आहे. विभागाच्या उपर्निर्दिष्ट शासन निर्णयान्वये गुजराती साहित्य क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या साहित्यिकांना दरवर्षी विविध पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. सदर पुरस्कार रकमेत दुपटीने वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

गुजराती साहित्य क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या साहित्यिकांना दरवर्षी विविध पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. गुजराती अकादमीमार्फत देण्यात येणाऱ्या खालील पुरस्कारांच्या रकमेत दुपटीने वाढ करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे:-

| अ.क्र | पुरस्काराचे नाव | पुरस्काराची सध्याची रक्कम | पुरस्काराची प्रस्तावित रक्कम |
|---|---|---|---|
| | **नर्मद पुरस्कार** | | |
| १ | कवी नर्मद मराठी साहित्य पुरस्कार | रु. ५१,०००/- | रु. १,००,०००/- |
| २ | कवी नर्मद गुजराती साहित्य पुरस्कार | रु. ५१,०००/- | रु. १,००,०००/- |
| | **जीवन गौरव पुरस्कार** | | |
| १ | साहित्य | रु. ५१,०००/- | रु. १,००,०००/- |
| २ | कला | रु. ५१,०००/- | रु. १,००,०००/- |
| ३ | पत्रकारीता | रु. ५१,०००/- | रु. १,००,०००/- |
| ४ | संस्था | रु. ५१,०००/- | रु. १,००,०००/- |
| | **वाङ्मय (विधा) पुरस्कार** | | |
| १ | चुनीलाल मडिया पुरस्कार (पुस्तकाचा प्रकार - नवल कथा) | प्रथम रु. १५,०००/-<br>द्वितीय रु. १०,०००/- | प्रथम रु. ३०,०००/-<br>द्वितीय रु. २०,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | रामनारायण पाठक पुरस्कार (पुस्तकाचा प्रकार - लघुकथा) | प्रथम रु. १५,०००/- | प्रथम रु. ३०,०००/- |
| | | द्वितीय रु. १०,०००/- | द्वितीय रु. २०,०००/- |
| ३ | हरश्चिंद्र भट्ट पुरस्कार (पुस्तकाचा प्रकार - कविता) | प्रथम रु. १५,०००/- | प्रथम रु. ३०,०००/- |
| | | द्वितीय रु. १०,०००/- | द्वितीय रु. २०,०००/- |
| ४ | प्रबोध जोशी पुरस्कार (पुस्तकाचा प्रकार - नाटक) | प्रथम रु. १५,०००/- | प्रथम रु. ३०,०००/- |
| | | द्वितीय रु. १०,०००/- | द्वितीय रु. २०,०००/- |
| ५ | वाडीलाल डगली पुरस्कार (पुस्तकाचा प्रकार - ललित निबंध) | प्रथम रु. १५,०००/- | प्रथम रु. ३०,०००/- |
| | | द्वितीय रु. १०,०००/- | द्वितीय रु. २०,०००/- |
| ६ | प्रागजी डोसा पुरस्कार (पुस्तकाचा प्रकार - बाल साहित्य) | प्रथम रु. १५,०००/- | प्रथम रु. ३०,०००/- |
| | | द्वितीय रु. १०,०००/- | द्वितीय रु. २०,०००/- |
| ७ | यशवंत दोशी पुरस्कार (पुस्तकाचा प्रकार - नवोदित लेखक) | प्रथम रु. १५,०००/- | प्रथम रु. ३०,०००/- |
| | | द्वितीय रु. १०,०००/- | द्वितीय रु. २०,०००/- |
| ८ | गोपाळराव विद्ववांस पुरस्कार (पुस्तकाचा प्रकार - अनुवाद) | प्रथम रु. १५,०००/- | प्रथम रु. ३०,०००/- |
| | | द्वितीय रु. १०,०००/- | द्वितीय रु. २०,०००/- |
| ९ | गुलाबदास ब्रोकर पुरस्कार (पुस्तकाचा प्रकार - प्रकिर्ण / समीक्षा) | प्रथम रु. १५,०००/- | प्रथम रु. ३०,०००/- |
| | | द्वितीय रु. १०,०००/- | द्वितीय रु. २०,०००/- |

०२. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या उपर्निर्दिष्ट दिनांक १८ जून, २०१३ रोजीच्या शासन निर्णयातील सर्व बाबी यथास्थिती लागू राहतील. तसेच, सदर शासन निर्णय ज्या दिनांकास निर्गमित होईल त्या दिनांकापासून सदरचा निर्णय अंमलात येईल.

०३. या प्रित्यर्थ होणारा खर्च लेखाशीर्ष मागणी क्र. झेडडी- २ प्रधान लेखाशिर्ष २२०५, कला व संस्कृती (००), १०२ कला व संस्कृती यांचे प्रचालन, (१२) गुजराती साहित्य अकादमी (१२) (०१) गुजराती साहित्य अकादमीची स्थापना (कार्यक्रम) (२२०५ १७२१) - ०५ बक्षिसे या लेखाशिर्षाखाली त्या-त्या वर्षाच्या अर्थसंकल्पित निधीतून भागविण्यात यावा.

०४. सदर खर्च वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/विनिमय, दिनांक १७ एप्रिल, २०१५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-३, अ.क्र. ४ परिच्छेद क्र. २७ (२) (अ) अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारानुसार मंजूर करण्यात येत आहे.

०५. यासाठी सहसंचालक, महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमी, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

०६. सदर प्रकरणी वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. अर्थसं-२०२४/ प्र.क्र.८०/ अर्थ-३, दिनांक २५ जुलै, २०२४ मधील सर्व परिच्छेद व परिशिष्टातील अटींनुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी सहसंचालक, महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमी, मुंबई यांची राहील.

०७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२४०८२४११५०४३३६२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

**( गोपिचंद पांडुरंग चव्हाण )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव सचिव (सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग मंत्रालय, मुंबई.
३. उप सचिव (सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग मंत्रालय, मुंबई.
४. सहसंचालक, महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमी, मुंबई
५. निवड समितीचे सर्व अशासकीय सदस्य (सहसंचालक, महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमी यांचे मार्फत)
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
८. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
९. महालेखापाल (लेखापरीक्षा) - १, महाराष्ट्र, मुंबई
१०. महालेखापाल (लेखापरीक्षा ) - २, महाराष्ट्र, नागपूर
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ) - १, महाराष्ट्र, मुंबई
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ) - २, महाराष्ट्र, नागपूर
१३. कक्ष अधिकारी (अर्थसं.), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
१४. निवड नस्ती, सां.का.४